# प्रेसनोट

**ला.प्र.विभाग, नाशिक**
**दि. २३.०६.२०२६.**

| | |
|---|---|
| **ला. प्र. विभाग** | नाशिक |
| **फिर्यादी** | सरकार तर्फे, श्रीमती रुपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, ला. प्र.वि. नाशिक |
| **पोलीस ठाणे व गुरनं** | इगतपुरी पोलीस स्टेशन,नाशिक ग्रामिण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| **अधिनियम व कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | **१)लोकसेवक** - सतिष साहेबराव दराडे, वय- ४२ वर्षे, सहायक अभियंता श्रेणी-१, जिल्हा परिषद (इ.व द.)उपविभाग, ता. इगतपुरी, जि. नाशिक. रा. मल्हार बंगला, जय मल्हारनगर, मखमलाबाद, नाशिक.<br>**२)लोकसेवक** - सागर सतिष रावले, वय- ३५ वर्षे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, श्रेणी - २, जिल्हा परिषद (इ.व द.)उपविभाग, ता. इगतपुरी, जि. नाशिक. रा. मल्हार बंगला, जय मल्हारनगर, मखमलाबाद, नाशिक.<br>**३)लोकसेवक** - रविंद्र रामनाथ गायकवाड, वय- २९ वर्षे, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद इ.व द.)उपविभाग, ता. इगतपुरी, जि. नाशिक. रा. सिध्दीविनायक हाईटस्, फ्लॅट नं. १९, विश्वेंदु नगर, चाणशी, नाशिक. |
| **लाच मागणी रक्कम** | ९,०००/- तडजोडअंती ६,०००/- रुपये |
| **लाच स्विकारलेली रक्कम** | ६,०००/- रू. त्या ५०० रु. दराच्या १२ भारतीय चलनी नोटा |
| **थोडक्यात हकिगत** | तक्रारदार यांनी सुशिक्षीत बेरोजगार अभियंता म्हणुन ठेकेदारीचा परवाना घेतला असुन त्यांनी १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायत पिंपळगांव मोर, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे दि. २१.११.२०२५ रोजी ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक, ग्रामपंचायत पिपळगांव मोर यांचेकडुन चार विकास कामाची निविदा मंजुर होवुन त्यापैकी सिमेंट रस्ता क्राक्रिंटीकरणाचे २,९९,९७०/-रुपये किमतीची ०२ कामे मुदतीत पुर्ण केली आहे. सदर कामाचे आलोसे क्रं. ०१ सतिष दराडे, उपअभियंता यांनी जागेवर मोजमाप करुन कामाच्या मुल्याकंनाची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली आहे.<br>सदर कामाचे बिलाबाबत तक्रारदार यांनी आलोसे क्रं. ०२ सागर रावळे, अभियांत्रिकी सहायक यांची दि. १८.०३.२०२६ रोजी भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना त्यांनी केलेल्या कामाचे एकुण ४,५०,०००/-रु बिल अदा करण्यासाठी आलोसे क्रं. ०१ सतिष दराडे, उपअभियंता यांना २ टक्याप्रमाणे ९,०००/-रु दयावे लागतील. त्याशिवाय ते मोजमाप पुस्तिकेवर सही करणार नाही असे सांगितले. तसेच आलोसे क्रं. ०१ यांनी मोबाईलवरुन तक्रारदार यांना आलोसे क्रं. ०२ अभियांत्रिकी सहायक रावळे यांनी सांगितल्याप्रमाणे पैसे त्याच्याकडे दया. मी मोजमाप पुस्तिकेवर सही करुन देतो असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि. २३.०३.२०२६ रोजी पडताळणी केली असता, आलोसे क्रं. ०२ यांनी तक्रारदार यांचेकडे २ टक्याप्रमाणे ९,०००/-रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ६,०००/-रु स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आलोसे क्रं. ०१ यांनी तक्रारदार यांचेकडुन आलोसे क्रं. ०२ यांनी |

| | |
|---|---|
| | सांगितल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती देवुन सदर लाचेची रक्कम आलोसे क्रं. ०२ यांचेकडे देण्यास सांगितले.<br>दि. २७.०४.२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता, आलोसे क्रं. ०१ सतिष दराडे यांनी तक्रारदार यांचेकडुन जिल्हा परिषद (इ.व.द.) उपविभाग इगतपुरी, जि. नाशिक येथे ६,०००/-रु लाचेची रक्कम त्यांच्या कार्यालयातील टेबलाच्या ड्राव्हरमध्ये ठेवण्यात सांगुन त्यानंतर सदर लाचेची रक्कम ड्राव्हरमधुन काढुन आलोसे क्रं. ०१ यांनी आलोसे क्रं. ०३ रविंद्र रामनाथ्रा गायकवाड, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्याकडे दिली. तेव्हा नमुद आरोपीतानां रंगेहाथ पकडण्यात आल्याने गुन्हा दाखल करण्याचे काम चालु आहे. |
| **सापळा कारवाई** | **सापळा अधिकारी** - श्रीमती रुपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग नाशिक, मोबाईल नं. ८३७९९६१०२०.<br>**कारवाई पथक** - पोहवा/संदिप वनवे, पोहवा/अविनाश पवार, पो.कॉ./प्रमोद पाळदे |
| **मार्गदर्शन** | मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक<br>मा. श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक<br>मा.श्री.सुनील दोरगे,अपर पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा सबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य यांचेशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता** - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नाशिक, तिबेटीयन भाजीपाला मार्केट एच.डी.एफ.
सी. बँक जवळ शरणपूर रोड नाशिक

**संकेतस्थळ -** acbmaharashtra.gov.in

**ईमेल** - spacbnashik@mahapolice.gov.in

**ऑन लाईन तक्रार** - acbmaharashtra.net

**टोल फ्रि क्रमांक** - 1064

**दुरध्वनी क्रमांक** - 0241- 2423677

**व्हॉट्सअप क्रमांक** - 9930997700- 9545031064

* * *